| | |
|---|---|
| | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११२९/२०२२**<br>रमेश शंकर वगैरे वि. कोणीही नाही<br>**सीएनआर क्र. एमएचडिएच–०२०००२५२४२०२२** |

## <u>निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने  बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला आहे.

२) **<u>अर्जातील थोडक्यात मतितार्थ खालीलप्रमाणे आहे.</u>**

अर्जदार क्र. १ ते ८ हे अर्जात नमूद पत्त्यावरील कायमचे रहिवासी आहेत. अर्जदार क्र. १ ते ८ हे मयत शंकर भिवा भामरे यांची मुले आहेत.  शंकर भिवा भामरे हे दि. ०५.०७.२००३ रोजी कापडणे येथे मयत झाले आहेत. मयत शंकर यांची पत्नी व अर्जदारांची आई सुपाबाई शंकर भामरे हया दि. १०.०१.२०१४ रोजी कापडणे येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार क्र. १ ते ८ यांच्याशिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत शंकर भिवा भामरे यांची मृत्यूची नोंद झालेली असून त्याबाबत ग्रामपंचायत, कापडणे यांनी मृत्यूचे प्रमाणपत्र दिले आहे.

३) मयत शंकर भिवा भामरे यांच्या नावे सरवड शिवार, ता.जि.धुळे येथील शेत गट क्रमांक व उपविभाग २४८/२, भूधारणा पध्दती – २ क्षेत्र १ हेक्टर १० आर ही मिळकत आहे.  त्यांचे वारस या नात्याने सदरील मिळकतीवर अर्जदार क्र. १ ते ८ यांच्या नावे नामांतराची कार्यवाही

करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यक असल्याने अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

वरील मिळकतीकामी अर्जदारांनी यापूर्वी दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे येथे दि.कि.अर्ज क्र. ६२८/२०१९ दाखल केला होता. सदरचा अर्ज दि. ०५.०२.२०२० रोजी मंजूर करण्यात आला. त्यानंतर मार्च – २०२० पासून कोरोना प्रादुर्भावामुळे शासनाने लॉकडाउन जाहीर केल्याने अर्जदारांना मे. न्यायालयात वेळेवर योग्य तो न्यायालयीन मुद्रांक देवून वारस दाखला घेता आला नाही. दरम्यानच्या काळात अर्जदार क्र. ३ नानाभाऊ शंकर भामरे हे आजारी होवून दि. १३.०५.२०२१ रोजी धुळे येथे मयत झाले. त्यामुळे त्यांच्या वारसांना वारसदार म्हणून सामिल करुन वारस दाखला घेणे गरजेचे असल्याने मयत नानाभाऊ यांचे वारस अर्जदार क्र. ३–अ ते ३–ड यांना सामील करुन सदरचा अर्ज वारसा हक्क प्रमाणपत्र मिळण्यासाठी नव्याने दाखल करण्यात आला आहे. त्याबाबत अर्जदारांनी मूळ दि.कि.अर्ज क्र. ६२८/२०१९ च्या निकालाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे.

४) सदर अर्जाच्या अनुषंगाने 'दैनिक वार्ता' या वृत्तपत्रामध्ये दिनांक १३.१०.२०२२ रोजी जाहीर प्रगटन देण्यात आले. सदर जाहीर प्रगटनास कोणीही आक्षेप घेतला नसल्याने प्रकरण एकतर्फा चालविण्यात आले.

५) अर्जदार क्र. १ रमेश शंकर भामरे यांनी त्यांच्या कथनाच्या समर्थनार्थ निशाणी क्र.११ वर शपथपत्र दाखल केले असून शंकर भिवा भामरे यांच्या मृत्यू दाखल्याची पडताळलेली प्रत निशाणी क्र. १२, सुपाबाई शंकर

भामरे यांच्या मृत्यू दाखल्याची पडताळलेली प्रत निशाणी क्र. १३, नानाभाऊ शंकर भामरे यांच्या मृत्यू दाखल्याची पडताळलेली प्रत निशाणी क्र. १४, अर्जदारांच्या आधार कार्डाच्या पडताळलेल्या प्रती निशाणी क्र. १५ ते २५, गट क्र. २४८/२ चा सातबारा उतारा निशाणी क्र. २६, मुल्यांकन दाखला निशाणी क्र. २७, दि.कि.अर्ज क्र. ६२८/२०१९ मधील न्यायनिर्णयाची सहीशिक्क्याची छायांकित प्रत निशाणी क्र. २८, दैनिक वार्ता या वृत्तपत्रात दि. १३.१०.२०२२ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली त्याची पावती निशाणी क्र. २९ व जाहीर नोटीसीचा अंक निशाणी क्र. ३० इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. वरील कागदपत्रांवरून मयत शंकर भिवा भामरे यांना अर्जदार क्र. १ , २, ३–अ ते ३–ड, आणि ४ ते ८ हेच कायदेशीर वारस असल्याचे दिसुन येते. अर्जदार क्र. १ , २, ३–अ ते ३–ड, आणि ४ ते ८ यांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणताही आक्षेप आला नसल्याने त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळण्यास ते हक्कदार असल्याबद्दलचा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर आल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर होणेलायक असल्याचे आढळते. सबब, खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २ | अर्जदार क्र. १ रमेश शंकर भामरे, अर्जदार क्र. २ सुरेश शंकर भामरे, अर्जदार क्र. ३–अ कलाबाई नानाभाऊ भामरे, अर्जदार क्र. ३–ब विशाल नानाभाऊ भामरे, अर्जदार क्र. ३–क वैशाली नानाभाऊ भामरे, अर्जदार क्र. ३–ड सागर नानाभाऊ भामरे, अर्जदार क्र. ४ सुभद्राबाई भ्र. बाबुराव वाघमारे, अर्जदार क्र. ५ मंगलाबाई भ्र. नाना भिल, अर्जदार क्र. ६ लताबाई भ्र. अशोक खैरनार, अर्जदार क्र. ७ आशाबाई भ्र. दिलीप शिरसाठ आणि अर्जदार क्र. ८ उषाबेन भ्र. विनायक जाधव हे मयत |

| | |
|---|---|
| | शंकर भिवा भामरे यांचे वारस असल्याचे घोषित करण्यात येते. |
| ३ | अर्जदार क्र. १ , २, ३–अ ते ३–ड, आणि ४ ते ८ हे मयत शंकर भिवा भामरे यांचे पश्चात कायदेशीर वारस असल्याबाबत त्यांच्या नावे वारसाहक्क प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन शुल्क दिल्यानंतर देण्यात यावे. |
| ४ | सदरचा दाखला फक्त प्रस्तुतच्या अर्जामध्ये दाखविलेल्या कारणापुरताच वापरता येईल. |

Digitally signed by KULKARNI MADHURI SUDHAKAR
Date: 2022.12.08 13:55:08 +0530

(**माधुरी एस. कुलकर्णी**)

दिनांक – ०८/१२/२०२२ दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, धुळे.

**–: <u>प्रमाणपत्र</u> :–**

मी प्रमाणित करते की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न् शब्द मूळ आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | नि.यु.भालेराव. |
| न्यायालयाचे नांव | दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, धुळे. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | ०८.१२.२०२२ |

स्वाक्षरित/–
लघुलेखक(श्रे.२).